दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : ३४५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, शनिवार, दि.२६ जुलै २०२५

**आजचा सुविचार**

आपल्या खराब सवयींबद्दल
गंभीरतेने विचार करा.
त्या बदला, जेवढं गरजेच आहे
तेवढंच घ्यायची सवय लावा....

## मोठी बातमी! महायुतीमधील मंत्र्यांचे फोन टॅप होत आहेत?

## रोहित पवारांचा खळबळजनक दावा !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, मुंबई :** राज्यभरात ब्रेक घेतलेल्या पावसाने गेल्या दोन दिवसांपासून अनेक भागांत जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. पावसाची ही स्थिती पुढील ४ दिवस कायम राहणार असल्याचे हवामान विभागाने सूचित केले आहे. कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत मुसळधार पाऊस बरसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



कोकणातील रायगड आणि रत्नागिरी, तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे साताऱ्यातील काही भाग आणि विदर्भात अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. घाटमाथ्यावर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उद्या २५ जुलैला या भागांत रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

उर्वरित महाराष्ट्रातही मध्यम स्वरुपाचा पाऊस बरसणार आहे. मराठवाड्यासह, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भाच्या भागांत २६ जुलैला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मुंबई, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागांत वीजांच्या कडकडाटासह पाऊस बसण्याची शक्यता आहे. यातच कोकणात पावसाची ही स्थिती पुढील चार दिवस कायम राहणार असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पावसाने पुनरागमन केल्याने बळीराजा सुखावला आहे. तर दुसरीकडे रायगडला मुसळधार पावसाने झोडपले आहे. जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड, रोहा, श्रीवर्धन, माणगाव आणि इतर दमदार पाऊस झाला आहे. किनारपट्टी भागात पावसाचा जोर वाढला आहे. परिणामी जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे हवामान विभागने येत्या ४८ तासांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. रत्नागिरीलाही अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

मुंबई आणि उपनगरांमध्येही दमदार पाऊस सुरु आहे. हवामान विभागाने मुंबईसाठी पुढील चार दिवस धोक्याचे असल्याचे सूचित केले आहे. २६ जुलैला समुद्रात ४.६७ मीटर उंच लाटा उसळणार असल्याचीही शक्यता आहे. नागरिकांनी समुद्रकिनाऱ्यांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## अनधिकृत पत्रकारांचा सुळसुळाट... हिमायतनगरचे सामाजिक वातावरण ढवळून निघाले

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.२५, हिमायतनगर :** हिमायतनगर शहरात सध्या स्वयंघोषित पत्रकार आणि अपवादात्मक सामाजिक कार्यकर्त्यांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली असून, या तथाकथित अपवादात्मक पत्रकारांनी आपापले खिसे गरम करण्याचा उद्योग सुरू केला आहे.

तालुक्याच्या बाहेरून येणारे अनेक अपप्रवृत्तीचे लोक पत्रकार किंवा कार्यकर्त्यांच्या नावाखाली प्रशासनावर दबाव आणून स्वार्थी फायद्यांचा खेळ खेळू लागले आहेत. गंमत म्हणजे, कोणत्याही अधिकृत ओळखपत्राशिवाय, कोणत्याही नोंदणीशिवाय हे लोक बातमीदार असल्याचा आव आणत आहेत. या मंडळींचे उद्दिष्ट समाजहित नसून, केवळ स्वतःचा स्वार्थ साधणे हेच आहे, हे उघड होत चालले आहे.

अधिकारांचा गैरवापर करून, प्रशासनाला विनाकारण त्रास देणाऱ्या अशा अनधिकृत पत्रकारांवर कडक कारवाई करून प्रशासनाने आता धाडस दाखवण्याची गरज आहे.

जर असेच चालू राहिले, तर खरे पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांची प्रतिमा मलीन होण्याचा धोका निर्माण झाला आहे. प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी याकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे.

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा जिल्हा दौरा



**दि.२५, बुलढाणा :** राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे शुक्रवार व शनिवार दि. २५ व २६ जुलै २०२५ रोजी शेगाव व खामगाव जि. बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दि. २५ जुलै रोजी रात्री ९.१५ आनंद विसावा, शेगाव जि.बुलढाणा येथे आगमन व राखीव.

शनिवार दि.२६ जुलै २०२५ रोजी सकाळी ७ वाजता श्री गजानन महाराज समाधीचे दर्शन. सकाळी ७.३० वाजता आनंद विहार येथे कार्यकर्त्यांशी भेट. सकाळी ९.३० वाजता खामगावकडे प्रयाण, सकाळी १० वाजता ब्रिटिश कालीन विश्रामगृह, खामगाव येथे सहकार विभागाच्या अधिकाऱ्यासमवेत आढावा बैठक. सकाळी ११.३० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. सकाळी ११.४५ वाजता शहर पोलीस स्टेशन येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. दुपारी १२ वाजता टॉवर चौक येथे महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन, दुपारी १२.१५ वाजता सानंदा निकेतन येथे सदिच्छा भेट व राखीव.

दुपारी १.१५ वाजता एकबोटे चौक, अग्रसेन चौक येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष जनसंपर्क कार्यालयास भेट. दुपारी १.३० वाजता शिवाजी महाराज स्टेडीअम समोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्घाटन. दुपारी १.४० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुड पुतळ्यास पुष्पहार व अभिवादन. दुपारी १.५० वाजता केशवराव कापले यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दुपारी २ वाजता मस्तान चौक येथील मस्तानशाह बाबा दर्गा येथे चादर चढविणे, दुपारी २.१५ वाजता मोहन चौक येथे देवेंद्र देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दुपारी २.३० वाजता सुटाळा येथे छत्रपती संभाजी महाराज व संताजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. दुपारी २.४५ वाजता घाटपुरीनाका येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्घाटन, दुपारी ३ वाजता घाटपुरी ग्रामपंचायत समोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उदघाटन. दुपारी ३.१५ वाजता जळका भडंग गाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्घाटन. दुपारी ४ वाजता भारत लॉन येथे शेतकरी मेळावा व कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. सायंकाळी ६ वाजता पिंपळगाव राजा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उदघाटन, सायंकाळी ७.३० वाजता राखीव व रात्री ८ वाजता नांदुरा रेल्वेस्टेशनकडे प्रयाण व आगमन. रात्री ९.४५ वाजता नांदुरा रेल्वे स्थानकावरुन मुंबईकडे प्रयाण करतील.

## घोडबंदर रोड ठरतोय यमसदनाचा मार्ग... खड्ड्यांवरून मनसे आक्रमक

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२५, ठाणे :** ठाणे शहरातील वाढत्या खड्ड्यांच्या समस्येवरून महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली असून, मनसेने गायमुख येथील घोडबंदर रोड परिसरात सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे महापालिका,एमएमआरडीए आणि एमएसआरडीसी अशा चारही यंत्रणांच्या अधिकाऱ्यांसमवेत खड्ड्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. मनसे ठाणे शहराध्यक्ष अविनाश जाधव यांच्या नेतृत्वाखाली ही पाहणी मेजर टेपसह करण्यात आली. यावेळी मनसेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पाहणी दरम्यान खड्ड्यांची मोजणी करून त्याच्या खोली, लांबी आणि रूंदीची नोंद घेण्यात आली. गेल्या सहा महिन्यांत फक्त घोडबंदर रोडवरील खड्ड्यांमुळे तब्बल १९ नागरिकांचा मृत्यू झाल्याचा आरोप मनसेने केला आहे. हे निष्पाप जीव नेमके कोणाच्या हलगर्जीपणामुळे गेले, याचा जाब मनसे नेते अविनाश जाधव



यांनी अधिकाऱ्यांना विचारला. त्यांनी सडेतोड शब्दांत सांगितले की, जर खड्डे लवकरात लवकर भरले नाहीत, तर मनसे स्टाईलने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. मनसेने यावेळी ठेकेदारांनाही लक्ष केलं. अविनाश जाधव म्हणाले, जर काही ठेकेदार आत्महत्येच्या विचारात असतील, तर त्यांनी आत्महत्या न करता, त्यांनी ज्या नेत्यांना टक्केवारीनुसार पैसे दिले आहेत, त्यांच्या नावांची यादी जाहीर करावी. खरे गुन्हेगार हे नेतेच आहेत. याशिवाय, जर एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या कुटुंबातील सदस्याचा जीव खड्ड्यामुळे गेला असता, तर कदाचित त्यांना या समस्येचे गांभीर्य लक्षात आले असते, असा तीव्र सवालही त्यांनी उपस्थित केला. घोडबंदर रोड, विशेषतः गायमुख परिसरात रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, खड्ड्यांमुळे दररोज अपघात होत आहेत. रस्त्यांच्या देखभालीबाबत जबाबदार असलेल्या सर्वच यंत्रणांनी दुर्लक्ष केले असल्याचे मनसेचे म्हणणे आहे. यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली असून, त्यानंतर देखील परिस्थितीत सुधारणा झाली नाही, तर मनसेकडून तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान या दौऱ्यात मनसेचे शहरातील विविध विभागांतील पदाधिकारी, महिला आघाडीच्या प्रतिनिधी, मनसैनिक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मनसेचा हा आक्रमक पवित्रा पाहता, येत्या काळात ठाणे शहरातील खड्ड्यांवरील दुर्लक्ष नक्कीच थांबेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## गणेशभक्तांसाठी आनंदाची बातमी! पुण्याहून कोकणसाठी धावणार १२ स्पेशल ट्रेन्स

**दि.२५, पुणे :** कोकणात गणेशोत्सवासाठी पुण्यातून जाणाऱ्यांसाठी पुणे रेल्वे विभागाकडून १२ विशेष रेल्वे सोडण्यात येणार आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाला कोकणात जाणाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. या गाड्यांचे आरक्षण २४ जुलैपासून सुरू होणार आहे. कोकणात गणेशोत्सव मोठ्या उत्साहामध्ये साजरा केला जातो. त्यासाठी कोकणवासी आपली गावी जातात. पुण्यात नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने कोकणातील अनेक नागरिक राहतात. त्यामुळे रेल्वेने विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

**पुणे ते रत्नागिरी साप्ताहिक विशेष...**

पुणे–रत्नागिरी साप्ताहिक विशेष रेल्वेच्या सहा फेऱ्या होणार आहेत. रेल्वे क्रमांक ०१४४७ शनिवारी २३, ३० ऑगस्ट व सहा सप्टेंबर रोजी पुण्यातून रात्री १२ वाजून २५ वाजता सुटेल. ती रत्नागिरी येथे सकाळी ११.५० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१४८८ साप्ताहिक विशेष



रेल्वे शनिवार २३, ३० ऑगस्ट आणि सहा सप्टेंबर रोजी रत्नागिरी येथून दुपारी ५.५० वाजता सुटेल आणि पुणे येथे पहाटे पाच वाजता पोहोचेल.

पुणे–रत्नागिरी वातानुकूलित साप्ताहिक विशेष रेल्वेच्या सहा फेऱ्या होणार आहेत. गाडी क्रमांक ०१४४५ मंगळवार २६ ऑगस्ट आणि दोन व नऊ सप्टेंबर रोजी पुण्यातून रात्री १२ वाजून २५ वाजता सुटेल. ती रत्नागिरी येथे सकाळी ११.५० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१४४६ मंगळवार २६ ऑगस्ट आणि दोन व नऊ सप्टेंबर रोजी रत्नागिरी येथून दुपारी ५.५० वाजता सुटेल आणि पुणे येथे पहाटे पाच वाजता पोहोचेल. या दोन्ही गाड्यांना चिंचवड, तळेगाव, लोणावळा, कल्याण, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, करंजडी, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड आणि संगमेश्वर रोड या ठिकाणी थांबा देण्यात आला आहे.

**विशेष रेल्वे आजपासून...**

मध्य रेल्वेने मुंबई / पुणे–कोकणदरम्यान दहा मार्गावर दोनशे पन्नास गणपती विशेष रेल्वे फेऱ्यांची घोषणा केली आहे. सर्व विशेष फेऱ्यांचे आरक्षण आज, गुरुवार २४ जुलैपासून सुरू होणार आहे. गाड्यांच्या सविस्तर माहितीसाठी मध्य रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या किंवा एनटीईएस मोबाइल ॲप डाउनलोड करा, असे आवाहन करण्यात आले आहे. मुंबईहून सुटणाऱ्या विशेष गाड्या सीएसएमटी; तसेच एलटीटी येथून रत्नागिरी, सावंतवाडी, मडगावसाठी सुटणार आहेत. पुण्याहूनही रत्नागिरीसाठी गाड्या सुटतील.

## डाक सेवांमध्ये डिजिटल क्रांती; आय.टी. २.० अप्लिकेशनचे कार्यान्वयन

## सोमवारी(४ ऑगस्ट) जिल्ह्यातील डाक सेवा बंद





**दि.२५ बुलढाणा :** भारतीय डाक विभाग आपल्या सेवा प्रणालीत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठी 'आय.टी. २.०' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत एपीटी (APT) अप्लिकेशन ही नवीन डिजिटल प्रणाली कार्यान्वित करत आहे. या नव्या प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे डाक व्यवहार अधिक जलद, अचूक आणि ग्राहकाभिमुख होणार असून, यामुळे पोस्ट ऑफिसमधील सेवा आणखी सक्षम होणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शाखा टपाल कार्यालये व उपडाकघरांमध्ये ही प्रणाली मंगळवार दि. ५ ऑगस्ट २०२५ पासून लागू करण्यात येत आहे. या संक्रमणासाठी आवश्यक असलेल्या डेटाच्या स्थलांतराची प्रक्रिया सोमवार दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणार असल्याने त्या दिवशी (दि. ४ ऑगस्ट रोजी) बुलढाणा जिल्ह्यातील कोणत्याही पोस्ट ऑफिसमध्ये व्यवहार करता येणार नाहीत. त्यामुळे महत्त्वाची कामे ४ ऑगस्टपूर्वीच पूर्ण करावीत, जेणेकरून व्यवहारात अडथळा येणार नाही, अशी माहिती अधिक्षक डाकघर, बुलढाणा यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली आहे.

## नांदगावजवळ भीषण अपघात; सख्ख्या भावांचा करुण अंत

**दि.२५, मनमाड :** गुरुवारी (दि. २४) नांदगावनजीक चांदेश्वरी घाटात एक दुःखद घटना घडली. कासारीहून बोलठाणकडे जाणाऱ्या दुचाकीला टेम्पोने धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील दोन सख्खे भाऊ राहुल खोडके (वय २६) आणि रोहित खोडके (वय २१) यांचा जागीच मृत्यू झाला. तर, समाधान मेंगाळ नावाचा तरुण गंभीर जखमी झाला. ही घटना नांदगावजवळ घडली. राहुल आणि रोहित हे दोघे भाऊ मूळचे अकोले (अहिल्यानगर) येथील होते. सध्या ते कासारी येथे राहत होते. ते तिघे तरुण दुचाकीवरून कुसुमतेल (बोलठाण) येथे जात होते. त्याचवेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या टेम्पोने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. टेम्पो (क्र. एमएच ४१ एयू ८५२५) बोलठाणहून कासारीला सिलिंडर घेऊन जात होता. अपघात इतका भीषण होता की, राहुल आणि रोहित यांचा जागीच मृत्यू झाला. राहुल खोडके (वय २६) व रोहीत खोडके (वय २१, रा. कासारी) अशी मृतांची नावे आहेत. समाधान मेंगाळ या अपघातात गंभीर जखमी झाला आहे. त्याला तातडीने नांदगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. त्याची प्रकृती चिंताजनक आहे.

नांदगाव पोलिसांनी घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेतली. या अपघाताची नोंद नांदगाव पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. दोन सख्ख्या भावांचा एकाच वेळी मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पोलिसांनी टेम्पो चालकाला ताब्यात घेतले असून, पुढील तपास करत आहेत.

# संपादकीय



## व्रत वैकल्याचा महिना श्रावण

काल म्हणजे शुक्रवारपासून श्रावण महिना सुरू झाला. हिंदू धर्मात श्रावण महिन्याचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. श्रावण महिन्यातील सोमवार हिंदू धर्मात पवित्र मानला जातो. या दिवशी महादेवाची पूजा केली जाते. तसे श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा व व्रत करण्याची हिंदू व जैन धर्माची परंपरा आहे. श्रावण महिन्याला सणांचा महिना म्हंटले जाते. कारण श्रावण महिन्यातच सर्वात जास्त सण येतात. या महिन्यात व्रत वैकल्याची रेलचेल असते. श्रावण महिन्यात नाग पंचमी, रक्षा बंधन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला, मंगळागौर, बैल पोळा हे सण येतात. त्यानंतर येणारे गौरी गणपतीही याच महिन्यात खुणावत असतात. नाग पंचमी पासून दसरा दिवाळी पर्यंत सगळ्या हव्या हव्याशा सणांची सुरुवात याच महिन्यापासून होते. सणांच्या दिवशी गोडाधोडाचा बेत घराघरात असतो. श्रावणातील प्रत्येक दिवस सण होऊन जातो. अशा आनंदी वातावणामुळे असेल कदाचित पण श्रावणात मनाच्या सांदी कोपऱ्यात उत्साहाचे नवे ऋतू फुलत असतात. बहुतेक सगळ्या सणामध्ये आणि अंगिकारल्या जाणाऱ्या व्रत वैकल्यांमधून संकटातून निर्भिडपणे आणि यशस्वीपणे बाहेर येण्यासाठी शक्ती मिळवण्यासाठी प्रेरणा मिळते. संसारातील सर्व सुख दुःखाचा सारीपाट मांडला असताना मन मोकळं करून सख्याना समजून घेण्याचे हक्काचे क्षण हा महिना देऊन जातो. श्रावण महिना केवळ हिंदुसाठीच नव्हे तर मुस्लिम आणि पारशी बांधवांसाठी ही पवित्र महिना मानला जातो कारण याच महिन्यात मुस्लिमांची बकरी ईद आणि पारशी बांधवांची पतेती हे सण येतात. त्यामुळे हिंदू प्रमाणेच जैन, मुस्लिम आणि पारशी बांधव श्रावण महिन्याची आतुरतेने वाट पाहत असतात. मुस्लिम आणि पारशी बांधव देखील त्यांचे सण उत्साहात आणि जल्लोषात साजरे करतात. श्रावण महिन्यात निसर्गाला उधाण आलेले असते. आषाढ महिन्यात झालेला पावसाने सर्वत्र हिरवळ दाटलेली असते. निसर्ग आषाढ सरी पिऊन हिरवे गालिचे पसरून बहरलेला असतो. हा हिरवा गालिचा पाहूनच

हिरवे हिरवेगार गालिचे
हरित तृणाच्या मखमालीवर....

ही कविता बालकवींना सुचली असावी. श्रावण महिन्यात सगळीकडे वसुंधरेवर श्रावणाच्या धारा बरसत असतात. श्रावणाच्या धारा बरसत असल्याने निसर्ग सौंदर्य तृप्तीचा हुंकार देत असतो. निसर्गाचे बहरलेले सौंदर्य पाहताच हासरा, नाचरा, लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला या ओळी ओठी गुणगुणावश्या वाटतात. श्रावण म्हणजे चैतन्य..... श्रावण म्हणजे उत्साह.....

**श्रावण मासी हर्ष मानसी**
**हिरवळ दाटे चोहिकडे**
**क्षणात येते सरसर शिरवे**
**क्षणात फिरून उन पडे**
**या कवितेत बालकवींनी**
श्रावण महिन्याचे चित्रण यथार्थपणे मांडले आहे.

## लोकमान्य टिळक यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**दि.२३, बुलढाणा :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# श्रावण महिन्यात...



श्रावण महिन्यात वारा झुळझुळ वाहतो या, झुळझुळ वाहतो या गाणं प्रितीच गातो या...

**धरती मातेला नटुन अशीच राहु दे, अशीच राहु दे, श्रावण रोजच येऊ दे..**

हे स्व.दादा कोंडकेंच्या 'वाजवू का ?' सिनेमातील गीत ऐकतांना कळत न कळत आपले मन ताल धरते आणि निसर्गाला साद घालू लागते. श्रावण महिना म्हणजे निसर्गाचा यौवनकाळ! डोंगर, मैदान अन् सारी सृष्टी हिरवा शालू नेसून नटलेली पाहताना डोळ्यांचे पारणे फिटून जात. श्रावण महिना हा तन, मन शुद्धतेचा अन् भक्ती-भाव जपण्याचा महिना होय. या महिन्यात असणारी सण उत्सवांची रेलचल आणि निसर्गाची कृपादृष्टी अनुभवताना मनात उमटणारे भावतरंग शब्दबद्ध करताना कवी, लेखक आणि लोककलावंतांच्या प्रतिभेला नवीन उमाळे फुटू लागतात. कवी कुसुमाग्रज कवितेतून श्रावणाचे येतोचित वर्णन पुढीलप्रमाणे करतात...

**हासरा नाचरा, जरासा लाजरा,**
**सुंदर साजिरा श्रावण आला**
**तांबूस कोमल पाऊल टाकीत**
**भिजल्या मातीत श्रावण आला**
**मेघांत लावीत सोनेरी निशाणे**
**आकाशवाटेने श्रावण आला**
**लपत छपत, हिरव्या रानात,**
**केशर शिंपीत श्रावण आला**
**इंद्रधनुष्याच्या बांधित कमानी**
**संध्येच्या गगनी श्रावण आला**
**लपे ढगामागे, धावे माळावर,**
**असा खेळकर श्रावण आला**
**सृष्टीत सुखाची करीत पेरणी**
**आनंदाचा धनी श्रावण आला**

एखादा पाळीव प्राणी पाळल्याप्रमाणे 'श्रावण पाळणे ' असा एक वाक्यप्रचार जनसामान्यात रुढ झाला आहे. कोणी मांसाहार वर्ज करून श्रावण पाळतो, तर काही पुरुष मंडळी दाढी अन् केश कर्तन न करता या महिन्या पुरतं 'वैराग्य' रूप धारण करून श्रावण पाळतात.



श्रावण महिन्यात येणाऱ्या पंचमीच्या सणाला झुळझुळ वाहणाऱ्या वाऱ्याला साद घालणारे झोके बांधले जातात. नवविवाहित माहेरवाशीनी नांदून आलेला शिनवटा घालवण्यासाठी झोके खेळतात. मंगळागौरीचा फेर धरतात. आपल्या संस्कृतीत श्रावण महिना अत्यंत पवित्र समजला जातो. पुण्य प्राप्तीसाठी विविध वृत्तवैकल्य, उपासतापास आणि शिवमुठ सारख्या परंपरा पाळल्या जातात. या महिन्यात पूजाअर्चा, भजन, आणि भक्ती गीत गायन यांना विशेष महत्त्व असतं. नगारा वाजून भगवान श्री शंकराला प्रसन्न केलं जातं. त्याच्या गळ्यातील नागदेवतेला नागपंचमी दिवशी पूजलं जातं. खरंतर आपले सारे सण हे निसर्गाशी संबंधित आहेत. पावसाळ्यात सर्रास सापांचं दर्शन आपल्याला होतं. अन्नसाखळीत इतर उपद्रवी प्राण्यांना आपले भक्ष बनवून, त्यांची संख्या संतुलित करणारा साप हा माणसाचा मित्रच आहे. जोपर्यंत आपणहून एखाद्या प्राण्याला दुखवत नाही किंवा मारण्याचा प्रयत्न करत नाही, तोपर्यंत तो प्राणी आपल्यावर हल्ला करीत नाही.त्याला साप सुद्धा अपवाद नाही.



जगामध्ये सुमारे २७०० प्रकारचे साप आढळतात. भारतात त्यापैकी २७८ जाती सापडतात. त्यात काही विषारी आहेत, काही सौम्यविषारी; तर बहुसंख्य बिनविषारी आहेत. महाराष्ट्रात एकूण ५२ जातीचे साप आढळतात. त्यात हाताच्या बोटांवर मोजण्याइतके साप विषारी आहेत. नाग, मण्यार, घोणस व फुरसे हे विषारी साप प्रामुख्याने अपल्या सभोवती आढळतात. यानंतर राहिलेले सगळेच बिनविषारी आहेत. उदाहरणार्थ धामण, गवत्या, तस्कर, अजगर, मांडूळ, दिवड, पट्टेरी पान सर्प, कुकरी इत्यादी. यानंतर विषारी आणि बिनविषारी यामध्ये मोडणारा सापांचा एक गट याला निमविषारी साप म्हणतात. जे चावले असता



फक्त ५ ते ६ तास झोप येते. उदा. हरणटोळ व मांज्या है दोन साप या प्रकारात मोडतात. सापाबद्दल आपल्या समाजात अनेक गैरसमज आहेत. हे गैरसमज नागपंचमी सारख्या सणा दिवशी जनजागृती पर उपक्रम घेऊन दूर केले पाहिजेत. उदाहरणार्थ साप दूध पितो. तो डूक धरतो. मंत्र उच्चार, अंगारा धुपारा आणि जडीबुटींनी साप चावल्यास उतरवता येतो.

श्रावण महिन्यात नारळी पौर्णिमा म्हणजेच राखी पोर्णिमा, गोकुळाष्टमी, बैलपोळा हे सण देखील उत्साहाने साजरे केले जातात. राखी पौर्णिमेला बहीण आपल्या भावाला मायेने राखी बांधते. नात्यात आलेला दुरावा दूर व्हावा म्हणून भाऊराया ओवाळणी देऊन तिला खुश करतो. वर्षभर राब राब राबणाऱ्या बैलाला बैलपोळ्याच्या दिवशी बळीराजा गावभर नटवून, सजवून वाजत गाजत मिरवून आणतो. त्याला पुरणपोळीचा नैवद्य चारतो. गोकुळाष्टमीच्या दिवशी उंचावर बांधलेली दहीहंडी मानवी मनोरे रचून फोडली जाते.

असा हा श्रावण मास प्रियजनांशी, प्राणीमात्रांशी आणि सभोवतालच्या बहरलेल्या निसर्गाशी आपले नाते दृढ करणारा आहे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## गांजणी...

मिटेना वाद विवाद
नेते सज्जरणांगणी
टार्गेट करा एखाद्या
फसे आरोप रिंगणी

शोधूनकाढा लफडी
काही नेत्या धाटणी
खोदून काढा गुपीते
कामाचीकरे वाटणी

खासविभाग पक्षांत
तपासकर्त्ये छावणी
खोटेपुरावे नाचवावे
रंगवछबील लावणी

झाकाळवे संभ्रमात
उपसावी धुणी उणी
रानपेटवाय मोकळी
मंडळी तरबेज गुणी

करा चित्त विचलित
नादखुळे हो पैंजणी
भुरळ घाली सकला
नाचते सत्तासाजणी

बदनाम करे सातत्ये
चुकांचीकरे मोजणी
मूढ शृढ गच्च भरले
माणिकमोतीरांजणी

दडून ठेवत वास्तवा
अशीचं रण बांधणी
जळत ठेवा विस्तवा
फुंकर घाले विंझणी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# मातृभाषेतून शिक्षण, हेच खरे शिक्षण

शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीयांचा गोंधळ उडतो.

विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते.

या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल. युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनातून मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व गुणवत्ता ही मातृभाषेतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी चांगली व सरस असते असे आढळून आले आहे. महात्मा गांधी म्हणतात मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे. मातृभाषेतूनच मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ अनिल काकोडकर म्हणतात, मातृभाषाच मुलांच्या स्वाभाविक शिक्षणाचे माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. इंग्रजी माध्यमाचा विचार केला तर इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलेल्या मुलांना सर्वच क्षेत्रात संधी उपलब्ध होईल असे पालकांना वाटते म्हणून पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना घालत असतील असे जरी मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिकलेले सर्वच मुले यशस्वी होतात असेही नाही. उलट आज जे उच्चपदावर पोहचलेले मान्यवर आहेत मग ते डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक असोत की शास्त्रज्ञ, उद्योजक, नेते, अभिनेते सर्वच मराठी भाषेतून शिकलेले आहेत. आयएएस,आयपीएस, आयएफएस यांची जर यादी पाहिली तर त्यातील ९५ टक्के अधिकाऱ्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले आहे. मागील काही वर्षात स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक संख्या मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीच आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रांस, जर्मनी, चीन, जपान, रशिया यासारख्या प्रगत देशातही मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते. या देशातील पालक जाणीवपूर्वक आपल्या मुलांना मातृभाषेतून शिक्षण देतात. फिनलँड सारखा देश की ज्या देशाच्या शिक्षण पद्धतीचे अनुकरण प्रगत राष्ट्रही करतात त्या देशातही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर मुलांना इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठी भाषेचा समृद्ध ठेवा लुप्त होईल. मुलांमध्ये, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, चांगल्या संस्काराचे रोपण करायला मातृभाषाच कामी येईल. शिक्षणात मातृभाषेमुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# मलेरिया व डेंग्यू वर आरोग्य शिबिरातून जनजागृती

## 'सफाई अपनाओ - बिमारी भगाओ' अभिनयामधून २६ ठिकाणी शिबीर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, नवी मुंबई :** 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ'अभियानाची नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध उपक्रमाच्या माध्यमातून अंमलबजावणी करण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात प्रत्येक ठिकाणी एक अशा एकूण २६ ठिकाणी आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते.

स्वच्छता आणि आरोग्य याबाबत व्यापक जनजागृती करणाऱ्या या २६ शिबीरांठिकाणी ११३४९ नागरिकांनी भेट दिली असून या शिबीरांमध्ये ७५५ नागरिकांचे रक्तनमुने घेण्यात आले आहेत.

दिनांक २५ एप्रिल पासून साथरोग व किटकजन्य आजारांबाबत जनजागृती करण्याकरिता २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या क्षेत्रात सातत्याने ३८८ जनजागृती शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरांना १,३४,८६५ नागरिकांनी भेट दिली असून ८५९९ नागरिकांचे रक्तनमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत.



या शिबीरांमध्ये नागरिकांनी वैयक्तिक स्वच्छतेसोबतच घरातील स्वच्छता, सोसायटी परिसरातील स्वच्छता व आजूबाजुची स्वच्छता यावर भर दिल्यास हिवताप / डेंग्यू, साथरोग यासारखे आजार दूर राहतील व प्रत्येक नागरिक व त्यांचे कुटुंब आरोग्यदायी राहील यावर विशेष भर देत व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे हिवताप / डेंग्यू व साथरोग आजार बाबत अधिक जनजागृती होण्याकरीता नमुंमपा कार्यक्षेत्रात ७८ नमुंमपा व खाजगी शाळांमध्ये १६९२९ शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत खाजगी वैद्यकीय व्यवसायिक यांच्या सभांचे आयोजन करण्यात आले आहे.

**नमुंमपा कार्यक्षेत्रामध्ये सन २०२४ व सन २०२५ मधील हिवताप, डेंग्यू रुग्णसंख्या खालीलप्रमाणे आहे.**

**सन-२०२४ :**

- कालावधी – १ जानेवारी २०२४ ते २१ जुलै २०२४
- घेतलेले रक्तनमुने – ७४७३०;
- हिवताप दूषित रुग्ण – २८;
- संशयीत डेंग्यू – ३७९;
- एनआयव्ही पुणे/सिव्हील हॉस्पिटल येथे पाठविण्यात आलेले रक्तजल – १२६;
- दूषित डेंग्यू रुग्ण – ९.

**सन - २०२५ :**

. कालावधी – १ जानेवारी २०२५ ते २२ जुलै २०२५

- घेतलेले रक्तनमुने – ९९०१०
- हिवताप दूषित रुग्ण – २४
- संशयीत डेंग्यू – ३२६
- एनआयव्ही पुणे/ सिव्हील हॉस्पिटल येथे पाठविण्यात आलेले रक्तजल – १००
- दूषित डेंग्यु रुग्ण – २

मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी मलेरिया व डेंग्यू रुग्ण संख्या मर्यादित असून यामध्ये डास उत्पत्ती स्थाने निर्माण होऊ न देण्याच्या नागरिकांच्या जागरुकतेचाही मोठा भाग आहे. त्यामुळे नवी मुंबई मनपा क्षेत्रातील सर्वच नागरिकांनी डास उत्पत्ती स्थाने आपल्या घरात व परिसरात निर्माण होऊ नये या विषयी दक्ष रहावे असे सूचित करण्यात येत आहे.

स्वच्छता व आरोग्य या एकमेकांना पूरक बाबी असून प्रत्येक नागरिकाने आपल्या वैयक्तिक स्वच्छतेवर लक्ष दिले. तसेच, घरातील व घराच्या आजुबाजूचा परिसर स्वच्छ ठेवला तर नवी मुंबईत साथरोग, हिवताप व डेंग्यू आजारावर आळा घालणे सहजशक्य होईल असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

**गॅलरीतील प्लास्टिकमध्ये वा नको पाणी छतावर, सतर्क राहून करु मात हिवताप / डेंग्यू वर**

# ठाण्यातील अनधिकृत इमारतींचा पाणी पुरवठा खंडीत होणार - पालिका आयुक्त



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२५, ठाणे :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मौजे शिळ येथील अनधिकृत बांधकामाच्या पाणी पुरवठ्याबाबत उच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या याचिकेच्या सुनावणी दरम्यान अनधिकृत बांधकामांना होत असलेल्या पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने तपास करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांना दिले आहेत.

उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने पुर्तता होण्याच्या दृष्टीकोनातून दिनांक २४ जुलै पाणी पुरवठा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची तात्काळ बैठक आयुक्त दालनात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे, विधी अधिकारी मकरंद काळे, उपनगर अभियंता विनोद पवार, सहाय्यक आयुक्त व पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये अनधिकृत बांधकामांना पाणीपुरवठा दिला असल्यास त्याची कागदपत्रे तपासण्यात यावी व बांधकाम अवैध असल्यास नळसंयोजन तात्काळ खंडीत करण्यात यावे, त्याचप्रमाणे महापालिकेच्या जलवाहिनीवरुन अवैधरित्या नळसंयोजन घेतले असल्यास ते तात्काळ खंडीत करावे. तसेच यापुढे पाणीसंयोजन देत असताना महापालिकेच्या बांधकाम परवानगी शिवाय कोणत्याही अनधिकृत बांधकाम नळ संयोजन दिले जाणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी व यापूर्वी जी नळसंयोजने दिली आहे ती तात्काळ खंडीत करण्यात करण्याचे आदेशही आयुक्तांनी संबंधितांना या बैठकीत दिले.

दरम्यान अनधिकृत बांधकामांना नळसंयोजने देताना कागदपत्रे न तपासता नळसंयोजने दिली असतील तर त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे संकेतही आयुक्त सौरभ राव यांनी दिले. ठाणे महापालिकेच्या ९ प्रभागसमिती कार्यक्षेत्रातील अनधिकृत इमारतींना परवानगीसह व परवानगी शिवाय देण्यात आलेल्या नळसंयोजनाची यादी तयार करुन त्यानुसार देण्यात आलेली सर्व नळसंयोजने तोडून टाकण्यात यावी तसेच अनधिकृतपणे तयार केलेल्या बोअरवेलवरही कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहे.

# भिवंडी तालुक्याला क्रीडेची उत्तम परंपरा आहे - गटशिक्षणाधिकारी आसवले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, ठाणे :** ठाणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महादेव बाबुराव चौगुले कनिष्ठ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने भिवंडी ग्रामीण तालुक्याची शासकीय शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन नियोजन सभा दिनांक २४ जुलै २०२५ रोजी दुपारी २ वाजता चौघुले महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित केली होती. सभेला भिवंडी ग्रामीणमधील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये विविध क्रीडा प्रकारात खेळाडूंची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने कशा प्रकारे करावी याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

सभेला मार्गदर्शक पाहुणे म्हणून भिवंडी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संजय आसवले, तालुका क्रीडा अधिकारी रुही शिंगाडे, धर्मेंद्र यादव व सिद्धार्थ वाघमारे, साई सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सुभाष चौगुले, महादेव बाबुराव चौगुले कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनायक दहिवले, क्रीडा केंद्रप्रमुख गुणवंत बेलखेडे, राष्ट्रीय कुस्ती पंच श्रीराम पाटील व ठाणे जिल्हा स्टार्डस ॲथलेटिक्स किड्स कपचे समन्वयक सुशील इनामदार हे उपस्थित होते.

गटशिक्षणाधिकारी आसवले यांनी सांगितले की, भिवंडी ग्रामीण तालुक्यात सध्या एकूण ३२५ शाळा असून ७२००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुलांचा सर्वांगीण विकास करण्याचे काम सर्व शिक्षक करत असतात. क्रीडा स्पर्धांच्या




माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे काम या तालुक्यातील क्रीडा शिक्षक जोमाने करत आहेत.

भिवंडी तालुक्याला क्रीडेची उत्तम परंपरा आहे. कुस्ती व कबड्डी खेळात अनेक खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली आहे. क्रीडा अधिकारी सिद्धार्थ यादव यांनी सांगितले की, शाळा व खेळाडूंसाठी शासनाच्या विविध योजना असतात. क्रीडा शिक्षकांनी त्या योजना स्वतः समजून घेऊन शाळा व खेळाडूंना त्या योजनांचा फायदा मिळवून द्यायला हवा. सभेचे प्रास्ताविक भिवंडी ग्रामीण तालुक्याचे क्रीडा केंद्रप्रमुख गुणवंत बेलखडे यांनी केले. सूत्रसंचालन क्रीडाशिक्षक विठ्ठल दिवेकर यांनी तर शेवटी सर्वांचे आभार क्रीडाशिक्षक नितीन पाटील यांनी मानले.

# अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांवर होणार कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** समाज कल्याण विभागाच्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत राज्यातील कनिष्ठ, वरिष्ठ, व्यावसायिक, बिगर व्यावसायिक अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. नागपूर विभागात दरवर्षी सुमारे ७० हजार विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतात. सन २०२५-२६ सत्रामध्ये काही महाविद्यालयांकडून प्रवेशाच्या




वेळी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क आकारण्यात येत असल्याचे निर्दशनास आले आहे. हे शासन निर्णयाचे उल्लंघन आहे. शासनाने स्पष्ट केले आहे की, पात्र विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शिक्षण शुल्क घेता कामा नये.

शिष्यवृत्ती योजना सुरळीतपणे व वेळेवर अंमलात आणण्यासाठी महाडीबीटी ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली असून, या प्रणालीद्वारे शिष्यवृत्ती थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. यामुळे विद्यार्थ्यांना आणि महाविद्यालयांना आवश्यक निधी वेळेत उपलब्ध होतो. काही महाविद्यालयांकडून शिक्षण शुल्काची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. याबाबत शासनाने सबंधित महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. पात्र विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क घेणाऱ्या तसेच आवश्यक कागदपत्रांची अडवणूक करणाऱ्या नागपूर विभागातील सर्व महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्यात येईल, अशा स्पष्ट सुचना नागपूर येथील समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी यांनी दिल्या आहेत.

# थोडक्यात

## मुंबई उपनगर जिल्हास्तरीय खेलो इंडियाची निवड चाचणी कबड्डीत समता शाळेच्या दोन खेळाडूंची निवड

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.२४, मुंबई :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई उपनगर यांच्या वतीने १२ वर्षाखालील मुले व मुलीं करिता मुंबई उपनगर शालेय जिल्हास्तरीय खेलो इंडिया निवड चाचणी कबड्डी २०२५ -२६ चे आयोजन दिनांक २४ जुलै २०२५ रोजी संदेश कॉलेज विक्रोळी पार्कसाइट येथे करण्यात आले होते. त्याकरिता जिल्हास्तरीय खेलो इंडिया निवड चाचणी कबड्डी या खेळाकरिता साकीनाका येथील समता विद्या मंदिर शाळेच्या शुभम मनोज यादव व आशिष दिलबर सिंग पनवार या दोन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. त्याबद्दल या दोन्ही ही खेळाडूंना शाळेचे सचिव राजेश सुभेदार व क्रीडा शिक्षकांकडून शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

## उपशिक्षणाधिकारी यांच्याशी विविध मुद्द्यांवर चर्चा



**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२५, मुंबई :** बृहन्मुंबई महानगपालिकेच्या शारीरिक शिक्षण विभागातील विद्यार्थी व शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी शारीरिक शिक्षण शिक्षक युनिटचे प्रमुख कार्यवाह डॉ. जितेंद्र लिंबकर यांनी उपशिक्षणाधिकारी किर्तीवर्धन किरतकुडवे यांची भेट घेतली. ते मुंबईतील वडाळा येथील सहकारनगर मनपा शाळेत आयोजित करण्यात आलेल्या प्राथमिक विभागाच्या योगासने स्पर्धेच्या उदघाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आले असता शारीरिक शिक्षण शिक्षकांना स्पर्धा कालावधीत येणाऱ्या अडीअडचणी, तसेच बी.एड.वेतनश्रेणी आणि उच्च शिक्षण प्राप्त केल्या बद्दल शारीरिक शिक्षण शिक्षकांना एक विशेष वेतनवाढ देण्याबाबत सविस्तर चर्चा केली. या चर्चेत उपशिक्षणाधिकारी किर्तीवर्धन किरतकुडवे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून शारीरिक शिक्षण शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी डॉ.जितेंद्र लिंबकर यांच्या समवेत कनिष्ठ पर्यवेक सुभाष डोफे, सुरेश भोसले, राजेश शिंदे आणि सुषमा ठाकूर यांच्यासह काही शारीरिक शिक्षण शिक्षक उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या कर्ज मुक्तीसाठी प्रहार दिव्यांग संघटनेचे चक्काजाम आंदोलन



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२४, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांसह प्रहार संघटनेशी संलग्न असलेल्या दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने शेतकरी बांधवांच्या कर्जमुक्ती सह इतर मागण्यासाठी दिनांक २४ जुलै २०२५ रोजी चक्का जाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शेतकरी, प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव जाहीर करून त्या हमीभावाने सर्वच शेतीमाल खरेदी करण्यात यावा त्याचबरोबर प्रत्येक शेतकऱ्याचे कर्ज माफ करून शेतकऱ्याचा सातबारा हा कर्जमुक्त करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा माजी आमदार बच्चू कडू यांनी जो लढा उभारलेला आहे. त्या लढ्याला पाठिंबा म्हणून पालम शहरांमध्ये प्रहार जनशक्ती पक्षाच्या, दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने गंगाखेड-लोहा रस्त्यावर मुख्य चौकात चक्काजाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलना दरम्यान शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती सह विविध मागण्याचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे. यावेळी प्रहारच्या दिव्यांग क्रांती संघटनचे बालाजी पौळ, बळीराम इंगळे, पत्रकार शिवाजीराव शिंदे, सूर्यभान ढगे, ललित सुर्वे, संतोष रोकडे, योगेश पवार, शेतकरी रामजी शिंदे, सिताराम गुरुजी पौळ यांच्यासह मोठ्या प्रमाणात शेतकरी व प्रहार जनशक्ती पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. अनुचित प्रकार घडू नये. यासाठी पालम पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक एस. के. खटाने यांच्या मार्गदर्शनाखाली साह्य.पोलीस निरीक्षक मंजुषा मोरे यांनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## राज्यात ६ जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट परिसरात रेड अलर्ट

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, मुंबई :** राज्यात पुढील २४ तासासाठी रायगड, रत्नागिरी, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली या ६ जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट परिसरात रेड अलर्ट देण्यात आला असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे. भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्रामार्फत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना दि.२५ जुलै २०२५ सायंकाळी ५.३९ ते दि. २७ जुलै २०२५ रात्रौ ८.३० पर्यंत ४.१ ते ४.८ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. समुद्राची धूप आणि उंच लाटांचे तडाखे समुद्र किनारी येण्याचा इशारा देण्यात आला असून जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदी इशारा पातळी ओलांडली असून नागरिकांना सतर्कतेचा सूचना देण्यात आल्या आहेत. पवना धरण ८२.२१ टक्के भरले असून पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू आहे. पवना धरणातून १६०० क्युसेक्स पाणी नदीपात्रात सोडले जाऊ शकते. त्या अनुषंगाने नागरिकांना सूचित करण्यात आले आहे.

मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात पाणी पुरवठा करणाऱ्या मोडक सागर, मध्य वैतरणा आणि तानसा या धरणातुन अनुक्रमे ४४८८.२५, २०१२.६७ आणि ३३१५.२५ क्युसेक इतका विसर्ग सुरू आहे. आपत्तीच्या अनुषंगाने प्रशासनातर्फे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना संभाव्य आपत्कालीन परिस्थितीत सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.